

संगीतकार कल्याणजीभाई

याद आए कभी तो मत रोना...

कल्याणजी-आनंदजी या जोडीतले संगीतकार कल्याणजी यांच्या निधनाला एक वर्ष पूर्ण झालं. तरीही आज कल्याणजी आपल्यातच आहेत असं वाटायला लावणारं त्यांचं संगीत आणि एक महान व्यक्तित्व म्हणून त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचा हा एक प्रयत्न.

☐ अजित पोपट

मुख्य संगीतकार हैराण झाले होते. त्या तरुणाने आपल्याला व्हायोलीन वाजवता येतं असं नोकरीवर ठेवताना सांगितलं होतं आणि आता व्हायोलीन वाजवायला सांगितल्यानंतर म्हणतो, मला येत नाही. आता काय करायचं? संयम राखून त्यांनी त्या तरुणाला सांगितलं, 'ठीक आहे, तुला काय येतं ते वाजवून दाखव.' यावर त्याने आपल्याला येतात ती सारी वाद्यं वाजवून दाखवली आणि मुख्य संगीतकार खूश झाले. 'पोरगं आहे हुशार,' स्वत:शीच बोलले. याला आपल्याकडेच ठेवायचं असा निर्णयही त्यांनी मनोमन केला.

अशाप्रकारे तो कच्छी तरुण हिंदीचित्रपट सृष्टीत संगीत क्षेत्रात प्रवेश करता झाला आणि पाहता पाहता आघाडीचा संगीतकार म्हणून नावारूपाला आला.

कल्याणजी वीरजी शहा असं त्या तरुणाचं नाव. कल्याणजी-आनंदजी या संगीतकार



कल्याणजींच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त आयोजित समारंभात मान्यवरांची उपस्थिती

छाया: हेतल फोटो आर्ट

जोडीतले कल्याणजी. बघता बघता त्यांना जाऊन एक वर्ष झालं. काळाची चक्रं फिरायची थांबत नाहीत. पण कल्याणजींचं देहावसान झालं त्यानंतरच्या पहिल्या रविवारी आयोजित शोकसभेत प्रचंड जनसमुदाय जमला होता. मुसळधार पावसातही लोक आपल्या लाडक्या संगीतकारासाठी अश्रू ढाळायला जमले होते.

जन्माने कल्याणजीभाई जैन होते. आणि जैन धर्माची शिकवण आहे, प्राणीमात्राशी मैत्री करण्याची. कल्याणजीभाई खऱ्या अर्थाने अजातशत्रू होते. त्यांच्या कारकीर्दीच्या यशाच्या सर्वोच्च शिखरावर असतानाही त्यांना औषधाला म्हणून कोणी शत्रू नव्हता ही गोष्ट खरोखरच कौतुकास्पद आहे. धार्मिक-पौराणिक चित्रपटांपासून कारकीर्दीची सुरुवात करणाऱ्या कल्याणजीभाईंना नंतर कधीही मागे वळून पाहण्याची वेळच आली नाही. अनेक मोठ्या बॅनर्ससाठी त्यांनी संगीतकार म्हणून काम केलं. अखेरपर्यंत आपल्या संगीताचं वेगळेपण आणि दर्जा कायम राखला.

कल्याणजीभाई खऱ्या अर्थाने यशस्वी संगीतकार होते. नागिन चित्रपटामुळे ते प्रकाशात आले. नागिनचे संगीतकार होते हेमंतकुमार. हेमंतदांना गारुड्याच्या पुंगीचा आवाज मिळवण्याची अडचण भासत होती. त्यावेळी क्लेव्हायलीन नावाचा परदेशी साज वाजवून कल्याणजींनी बाजी मारली. परदेशी बनावटीच्या इलेक्ट्रॉनिक साजांचा आजच्यासारखा तेव्हा सुळसुळाट नव्हता. पण ते साज हिंदी चित्रपटांत पहिल्यांदा वापरण्याचं श्रेय अशाप्रकारे कल्याणजीभाईंकडे गेलं.

संधी मिळताच हेमंतकुमारचे दोन्ही सहाय्यक रवी आणि कल्याणजी यांनी स्वतंत्रपणे संगीतकार म्हणून काम करायला सुरुवात केली. रवीने परंपरेनुसार काम केलं तर कल्याणजीभाईंनी नव्या वाटा चोखाळून नव्या परंपरा तयार केल्या. त्यावेळी संगीतकार एखाद्या निर्मात्यासाठी किंवा दिग्दर्शकासाठी काम करत. नौशाद, कारदार, मेहमूद आणि आसिफबरोबर राहिले. एस.डी. बर्मन मोठ्या प्रमाणावर नवकेतनबरोबर तर सी. रामचंद्र-वसंत देसाई हे व्ही. शांतारामांच्या राजकमलबरोबर काम करत होते. त्याचप्रमाणे रवीनेही बी.आर.चोप्रा, देवेन्द्र गोयल आणि रामानंद सागर यांची कास धरली.




स्टेज शोला नवं रूप देणारे कल्याणजी
-अमिताभ बच्चन



बालप्रतिभेला व्यासपीठ मिळवून देणारं लिटल वंडर्स

कल्याणजीभाईंनी मात्र असं कोणा एकालाच पकडून ठेवलं नाही. त्यांनी सगळ्या निर्मात्यांबरोबर, दिग्दर्शकांबरोबर तसंच कलाकारांसाठी काम केलं. सुभाष देसाई आणि बाबुभाई मिस्त्री यांच्याबरोबर त्यांनी स्वतंत्रपणे कामाची सुरुवात केली. पण नंतर मनोजकुमार, विजय भट, मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा, फिरोज खान अशा कितीतरी निर्मात्यांबरोबर त्यांनी काम केलं. कोणत्याही निर्मात्याबरोबर वा दिग्दर्शकाबरोबर काम करताना त्यांना कधीही काही अडचण आली नाही, कारण त्यांचा स्वभावच सगळ्यांशी जुळवून घेण्याचा होता. राज कपूर, दिलीपकुमार, देव आनंद, सुनील



ट्रॅजेडी किंग दिलीप कुमार आणि गानकोकिळा
लताजींबरोबर एका सुरील्या क्षणी



रामानंद सागर आणि महंमद रफीबरोबर आजा तुजको पुकारे मेरे गीतच्या रेकॉर्डिंग प्रसंगी

दत्त, शम्मी कपूर, शशी कपूर, जितेंद्र, धर्मेंद्र, मनोजकुमार, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन...कोणाशी त्यांचे सूर जुळले नाहीत असं नाही. तेही प्रत्येकाची कामाची पद्धत, गरज लक्षात घेऊन ते काम करत होते. आणि इतकं करूनही आपल्या संगीताचा दर्जा कायम टिकवून ठेवला.

कल्याणजीभाई चांगले संगीतकार होते, कारण ते संगीताचे चांगले दर्दी होते. थोडक्यात ते चांगले कानसेन होते. त्याकाळीही आपल्या कामाच्या व्यापातून वेळ काढून सूरसिंगार संसद, साजन, मिलाप किंवा इंडियन म्युझिक ग्रुपचं संगीत ऐकायला ते खास तिकीट काढून हजेरी लावत. १९६० च्या दशकात पाकिस्तानचे विश्वविख्यात गायकबंधू उस्ताद सलामत खाँ आणि उस्ताद नजाकत खाँ मुंबईतील ऑपेरा हाऊस परिसरातील भटवाडी भागात गाण्यासाठी आले होते. तिथेही इतरांच्या बरोबर कल्याणजीभाई जमिनीवर अंथरलेल्या सतरंजीवर बैठक मारून बसले. तिथेच त्यांच्याशी माझा परिचय झाला. त्यावेळी ते म्हणाले, 'चांगला श्रोता असल्याशिवाय चांगला संगीतकार होताच येत नाही. मला पाहून स्टेजवरच्या कलाकारांना बरं वाटतं तसं मलाही इथे येऊन काहीतरी शिकायला मिळतं.'

खरंच आहे ते. त्याशिवाय का ते इतकं चांगलं संगीत देऊ शकले? जय नंदलाला जय गोपाला (राग भटियार, चित्रपट घर घर की कहानी), बेदर्दी दगाबाज जा तू नाही बलमा मोरा (राग बागेश्री, चित्रपट ब्लफ मास्टर), जीवन से भरी तेरी आँखे मजबूर करे जीने के लिये (तोच बागेश्री राग, चित्रपट सफर), मुझको इस रात की तनहाई में आवाज न दो (राग भैरवी, चित्रपट दिल भी तेरा हम भी तेरे), परदेसीयोंसे ना अखियाँ मिलाना (राग शिवरंजनी, जब जब फूल खिले), वक्त करता जो वफा आप हमारे होते (राग अहिरभैरव, दिलने पुकारा) हे काही नमुने आहेत. राग भैरवी आणि शिवरंजनीत तर त्यांनी अनेक लोकप्रिय गीतं दिली आहेत. एकदा तर जयकिशन (शंकरजींबरोबरचे) यांनी म्हटलं होतं, यार, तुम्ही अशा बंदिशी बनवता की ज्याला माहीत नाही तो त्या शंकर-जयकिशनच्याच समजून बसेल. यापेक्षा त्यांना आणखी मोठी शाबासकी कोणती वाटणार? मुकेशसाठी चांगली दर्दभरी गीतं

कल्याणजी-आनंदजींनी दिली असं याच जयकिशन आणि खुद्द मुकेशनेही कबूल केलं होतं.

संगीतात माधुर्य महत्त्वाचं असतं तितकीच सहजताही आवश्यक असते. पुन्हा ते वेगळं वाटायला हवं. या सगळ्या गोष्टींचं भान कल्याणजींना असायचं. भारतीय संगीतातील पायाभूत समजला जाणाऱ्या यमन रागातलं चंदन सा बदन चंचल चितवन.... (*सरस्वतीचंद्र*) गीत किती भावपूर्ण आहे? विविधतेबद्दल बोलायचं झालं तर याच चित्रपटातलं मै तो भूल चली बाबूल का देस किंवा मेरी प्यारी बहनिया बनेगी दुल्हनिया (*सच्चा झूठा*), ओ बाबूल प्यारे... (*जॉनी मेरा नाम*) अशी कितीतरी उदाहरणं देता येतील. पारिवारिक प्रकारातली ही गीतं आहेत तशीच छुप छुप मीरा रोये (*जॉनी मेरा नाम*), सुख के सब साथी (*गोपी*), जय नंदलाला जय गोपाला (*घर घर की कहानी*) यांसारखी भक्तिगीतं, किंवा चांद सी मेहेबुबा हो मेरी कब (*हिमालय की गोद मे*), आजा तुजको पुकारे मेरे गीत रे (*गीत*), ओ साथी रे तेरे बीना क्या जीना (*मुकद्दर का सिकंदर*) यांसारखी प्रणयगीतं अथवा समझौता गमोंसे कर लो (*समझौता*), कस्में वादे प्यार वफा सब (*उपकार*), वो मुकद्दर का सिकंदर जानेमन कहलायेगा (*मुकद्दर का सिकंदर*) अशी फिलॉसॉफिकल गीतं. किती हे वैविध्य! ही यादी करायची म्हटली तर एक स्वतंत्र पुस्तकच लिहावं लागेल, कारण कल्याणजी-आनंदजी या जोडीने तीनशेपेक्षा अधिक चित्रपटांत संगीत दिलेलं आहे.

अध्यात्माची गोष्ट निघालीच आहे, तेव्हा आणखी एक उल्लेख आवर्जून करायला हवा. चित्रपटाच्या क्षेत्रात राहूनही कल्याणजी एखाद्या कमळाप्रमाणे या क्षेत्रातील वाईट गोष्टींपासून, मोहांपासून अलिप्त राहिले. भावनगरचे जीवा बापा, आचार्य रजनीश, कानजी स्वामी, चित्रभानुजी, मोरारीबापू अशा बऱ्याच महापुरुषांशी त्यांचा संबंध आला होता. त्यांना अध्यात्मात रुची होती. ते नेहमी म्हणायचे, संगीताची आराधना हे माझं कर्म आहे तर परमेश्वराची आराधना हे माझं कर्तव्य आहे. कर्मासाठी कर्तव्यात कसूर करून चालणार नाही.



किशोरकुमार सारख्या मनस्वी कलाकाराकडून चुचकारून काम कसं करून घ्यायचं ते कल्याणजींना बरोबर जमायचं



मुकेशसारख्या गायकाशी कल्याणजींचं विशेष सख्य होतं


म्हणूनच मग कल्याणजीभाई आपल्या टीकाकारांबद्दलही नेहमी चांगलं बोलत. ते कधीही कोणाचं वाईट चिंतत नसत. क्षमाशीलता हा त्यांचा आणखी एक गुण होता.

माणसं जमवण्याची कला कल्याणजींना जन्मत:च अवगत असावी. स्वत: अशोककुमार आपल्या लहान भावाच्या किशोरकुमारच्या मुड्सना घाबरून असत. पण कल्याणजीभाई काम निघाल्यावर किशोरकुमारला घरी फोन करत आणि तोही कल्याणजींचा फोन आहे म्हटल्यावर धावत पळत येत असे. कल्याणजींना देवाज्ञा झाल्याचं कळल्यावर अमिताभ बच्चन सर्वप्रथम त्यांच्या घरी हजर झाला होता असं वीजू शहांनी सांगितल्याचं पक्कं आठवतंय.

समाजाप्रती त्यांना नेहमीच आस्था वाटायची. समाजासाठी काहीतरी करावं अशी तळमळ वाटायची. पूर असो, भूकंप असो, दुष्काळ असो मदतीसाठी कल्याणजीभाई सर्वात पुढे असायचे. तीस-पस्तीस वर्षांच्या कालावधीत कल्याणजी-आनंदजींच्या जोडीने अशा संकटग्रस्तांसाठी पन्नास करोडपेक्षा अधिक निधी जमा करून दिलेला आहे.

नवोदितांमधले गुण हेरून संधी देणारे संगीतकार म्हणूनही त्यांची ख्याती होती. मनहर उधास या गुणी गायकाला त्यांनी संधी दिली होती. उपकार चित्रपटातून महेंद्र कपूरला संधी देऊन रातोरात आघाडीच्या गायकांच्या पंक्तीत नेऊन बसवलं. पं. जसराजांची एक विद्यार्थीनी, तिच्या आवाजातला गोडवा नेमका हेरून तिला प्रशिक्षण देऊन साधना सरगम नावाने पुढे आणली.

आयुष्याच्या अखेरच्या दिवसांत त्यांनी निवृत्ती पत्करली. पण इतर निवृत्त संगीत-कारांप्रमाणे ते रिकामे बसून राहिले नाहीत. किंवा इतरांच्या चुका शोधून त्यांच्यावर टीका केली नाही. लिटल वंडर्स नावाची संस्था स्थापन करून बालकलाकारांना संधी दिली. कलावीर (कल्याणजी वीरजी) नावाची अकादमी स्थापन केली. संगीताच्या क्षेत्रात कल्याणजींनी दिलेलं हे योगदान त्यांना मरणोत्तरही महान ठरवणारं आहे. ●







महेंद्र कपूर, मनहर उधास, सोनाली वाजपेयी, साधना सरगम.... कल्याणजींनी मोठं केलेल्या कलाकारांची यादीही मोठी आहे.